# महाराष्ट्र शासन

## अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांचे कार्यालय

पत्रव्यवहाराचा पत्ता :- प.पु.डॉ.केशव बळीराम हेगडेवार भवन इमारत, पहिला माळा, मॅक्सस मॉलच्या मागे, अमृतवाणी रोड, भाईंदर (प)- ४०१ १०१. तालुका-ठाणे, जिल्हा- ठाणे.

दुरध्वनी क्र. ०२२-२८१८५९१६ ईमेल आयडी -tahmirabhayander@gmail.com

क्र.महसूल /कांदळवन/कावि-८६०/९५७/२०२० दिनांक :१४/१०/२०२०

प्रति,
मा.उप वनसंरक्षक,
कांदळवन कक्ष, मुंबई

**विषय :** भाईंदरच्या उत्तन येथील पाली ते करई पाडा - उत्तन नाका दरम्यानच्या नवीखाडी पात्र व परिसरातील कांदळवनाची मोठया प्रमाणात तोड करुन भराव, कचरा टाकणे व बांधकामे केल्या प्रकरणी.

**संदर्भ :** कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती यांचेकडे अर्जदार श्री. धीरज परब यांनी दाखल केलेली तक्रार
तक्रार अ.क्र.१२६

कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती यांचेकडे श्री. धीरज परब यांनी दाखल केलेली तक्रार या कार्यालयास प्राप्त झालेली आहे. (तक्रार अ.क्र.१२६)

उपरोक्त विषयांकित तक्रारीच्या अनुषंगाने मौजे उत्तन, ता.जि.ठाणे येथील जमीन स.नं. २९५अ/१ याबाबत कांदळवन झाडाचे नुकसान झालेबाबत तक्रारदार पत्रकार, श्री. धीरज रमेश परब यांनी तक्रार सादर केली होती. त्यानुसार त्यानुसार प्रथम: दि.२३/०६/२०२० रोजी तक्रादार यांचे समवेत तलाठी साझा उत्तन यांनी स्थळपहाणी केला होती. तदनंतर दि. २२/०७/२०२० रोजीच्या स्थळपहाणी वेळी १) परिमंडळ वन अधिकारी घोडबंदर, २) उप अधीक्षक भूमी अभिलेख, ठाणे, ३) भूकरमापक, ४) अनुरेषक नगररचना विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका या कार्यालयातील कोणीही प्रतिनिधी उपलब्ध नसल्यामुळे सदर जमिनीच्या हद्दी व झाडांबाबत माहिती मिळू शकली नाही. तदनंतर दि. ०४/०८/२०२० रोजी ठेवणेत आलेली स्थळपाहणी अतिवृष्टीमुळे करता आलेली नाही. त्यामुळे दि. ०७/०९/२०२० रोजी मौजे उत्तन, ता.जि.ठाणे येथील जमीन स.नं. २९५अ/१ पुन्हा स्थळपाहणी करण्यात आलेली आहे. सदर स्थळपाहणी वेळी (१) श्री. धीरज परब, तक्रारदार, पत्रकार, (२) श्री. सुनील देसाई, नायब तहसिलदार, (३) श्री. मनोज भा. पाटील, परिमंडळ वन अधिकारी, घोडबंदर, (४) श्री. मंगेश करलाद, नगररचना, मिरा भाईंदर मनपा, (५) श्री. शैलेश पेंढर, उपअधिक्षक भूमी अभिलेख, ठाणे, (६) श्री.एन.डी.नांदुरकर, पोलीस हवालदार, उत्तन पोलीस स्टेशन तसेच मंडळ अधिकारी, भाईंदर व संबंधित तलाठी यांनी विषयांकित जागेची स्थळपाहणी केली असुन मंडळ अधिकारी भाईंदर यांनी त्यांचेकडील पत्र जा.बा.नि.क्र.३८/२०२०-२१ दि.०९/०९/२०२० अन्वये खालील प्रमाणे एकत्रित स्थळपहाणी अहवाल या कार्यालयास सादर केला आहे.

Steno Letter to MBMC

१) सदर स्थळपाहणी वेळी मोजणी अधिकारी श्री. शैलेश पेंढर हे उपस्थित होते. मौजे उत्तन, ता.जि.ठाणे येथील जमीन स.नं. २९५ अ/१ क्षेत्र ९.९७.० (हे.आर) कब्जेदार सदरी बिन आकारी सरकारी यांच्या नावाची नोंद असुन ७/१२ च्या इतर हक्क सदरी क्षेत्र ४ एकर ३४ गुंठे करिता जमीन मच्छिमार करणाऱ्या लोकांना राखुन ठेवण्यात आलेली आहे. सदर उर्वरित क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात अनाधिकृत रहिवास बांधकामे दिसुन आलेली आहेत. सदर बांधकामे सदर सरकारी स.नं. २९५अ/१ च्या लगत असलेल्या खाडीलगत आहेत. सदर बांधकामे स.नं. २९५ अ/१ मध्ये असलेबाबत मोजणी अधिकारी यांनी सांगितले. सदरची बांधकामे पाहिली असता ती अंदाजे ३० ते ४० वर्षांपासुनची आहेत. त्यामध्ये काही बांधकामे तोडुन संबंधित घर मालकांनी नव्याने बांधकामे केलेली आहेत. असे त्यांनी त्यांचे अभिप्राय दिलेले आहे.

२) सदर स्थळपाहणी वेळी अधिकारी श्री. मनोज भा. पाटील, परिमंडळ वन अधिकारी, घोडबंदर, हे उपस्थित होते. यांनी मौजे उत्तन. ता.जि.ठाणे येथील जमीन **स.नं. २९५ अ/१ ची पाहणी केली असता त्यामध्ये बांधकामे करताना खाडीतील वाहते पाणी बंद झाल्यामुळे खाडीतील कांदळवनाची झाडे सुकलेले आहेत. व आज रोजी कुठल्याही प्रकारच्या कांदळवनाच्या झाडांची तोड झालेली दिसुन आलेली नाही, असे सांगितले. परंतु खाडीतील पाण्याचा प्रवाह बंद झाल्यामुळे तसेच तेथे राहणाऱ्या लोकांनी मोठ्या प्रमाणात कचरा टाकल्यामुळे खाडीतील कांदळवन झाडांना नुकसान पोहचत आहे. यासाठी सदर खाडीतील पाण्याचा प्रवाह पूर्ववत होणेसाठी खाडीतील संपूर्ण कचरा व गाळ काढणे आवश्यक आहे.** असे त्यांनी त्यांचे अभिप्राय दिले आहे.

३) सदर स्थळपाहणी वेळी अनूरेषक नगररचना विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका तर्फे श्री. मंगेश करलाद हे उपस्थित होते. यांनी मौजे घोडबंदर, ता.जि.ठाणे येथील जमीन **स.नं. २९५ अ/१ मधील असलेली सर्व बांधकामे ही अनधिकृत असुन ती बांधकामे तेथील स्थानिक लोकांची असुन ती बांधकामे अंदाजे ३० ते ४० वर्षापासुनची आहेत.** सदर ठिकाणी मिरा भाईंदर महानगरपालिकेने कोंक्रीट रस्ता, नळयोजना, घरपट्टी आकारणी तसेच अदानी यांची इलेक्ट्रीसिटी पॉवर देण्याचे दिसुन आले. **सदर ठिकाणी काही जुनी बांधकामे तोडुन नवीन बांधकामे केलेली आहेत. व काही बांधकामे पुर्णत: नवीन करण्यात आलेली आहेत. या बांधकामाबाबत निष्कासित करण्याची कार्यवाहीसाठी सदर बांधकामाचे मिरा भाईंदर महानगरपालिका येथील कर विभाग यांचेकडुन प्रत्येक बांधकामाचे अभिलेख तपासुन अभिप्राय घेणे आवश्यक** वाटते असे मिरा भाईंदर महानगरपालिका नगर रचना श्री. मंगेश करकाद यांनी त्यांचे अभिप्राय दिले आहे.

तरी प्रस्तुत स.नं. २९५ अ/१ वरील झालेली पुर्वीपासुनची बांधकामांना मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सर्व साई उपलब्ध करुन दिलेल्या दिसुन आल्या. तसेच अदानी पॉवर यांनी सुध्दा त्यांचे वीजपुरवठा दिलेला आहे. सदर ठिकाणी काही कोळी बांधव सुध्दा त्यांची तक्रार घेऊन हजर झालेले होते. त्यांनी सदर जमिनीवरील बांधकामामुळे कांदळवन झाडांना नुकसान पोहचत आहे, असे सांगितले. सदर प्रकरणी **मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेकडुन सदर खाडीतील गाळ व कचरा काढुन घेतलेस पाण्याचा प्रवाह सुरु होईल व त्यामुळे खाडीतील कांदळवन झाडांना नुकसान होणार नाही** असे वाटते. तसेच अनाधिकृत घरांची बांधकामे ही स्थानिक लोकांची असुन ती अंदाजे ३० ते ४० वर्षांपासुनची आहेत, असे स्थानिक लोकांनी सांगितले. तरीही सदर बांधकामाबाबत कर विभाग मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेकडुन अभिप्राय घेऊन पुढील कार्यवाही करता येईल.

परिक्षेत्र वन अधिकारी, येऊर यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र. ब/कक्ष-२/येऊर/जमिन/३३१/सन २०२०-२१, येऊर दि. २२/०९/२०२० अन्वये सर्वे क्र.२९५ हे क्षेत्र भाईंदर उत्तन येथील पाली ते करईपाडा-उत्तन नाका दरम्यानच्या नवीखाडी पात्र व परिसरातील कांदळवनाची पाहणी केली असता, **सदर क्षेत्रात १०० ते १२० पर्यंत निवासी व व्यवसायिक गाळे असुन, सदर घरमालक व गाळेधारकांनी अनाधिकृतपणे खाडीच्या पात्रात बांधकाम केल्यामुळे तसेच कचरा व डेब्रीज टाकल्यामुळे खाडीच्या पाण्याचा प्रवाह थांबला आहे. त्यामुळे खाडी पात्रात असलेले कांदळवनातील असंख्य झाडांना धोका पोहचत आहे. सर्व अतिक्रमकांना मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत सोईसुविधा, विज पुरवठा करण्यात आला आहे.** असा अहवाल सादर केला आहे.

सदर तक्रारीबाबत प्रत्यक्ष स्थळपाहणी, परिक्षेत्र वन अधिकारी, येऊर यांचा अहवाल व अर्जदार यांचे मागणीनुसार या कार्यालयाचे पत्र क्र.महसूल/कांदळवन/कावि-८६०/९५७/२०२० दि.३०/०९/२०२० अन्वये उपआयुक्त, अतिक्रमण विभाग, उपआयुक्त, कर विभाग, प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र.०१, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना मौजे उत्तन, ता.जि.ठाणे येथील स.नं. २९५ अ/१ येथील सदर क्षेत्रात १०० ते १२० पर्यंत निवासी व व्यवसायिक गाळे असुन, सदर घरमालक व गाळेधारकांनी अनाधिकृतपणे खाडीच्या पात्रात बांधकाम केल्यामुळे तसेच कचरा व डेब्रीज टाकल्यामुळे

खाडीच्या पाण्याचा प्रवाह थांबला आहे. त्यामुळे खाडी पात्रात असलेले कांदळवनातील असंख्य झाडांना धोका पोहचत आहे. तरी याबाबत **सदर खाडीतील पाण्याचा प्रवाह पूर्ववत होणेसाठी खाडीतील संपूर्ण कचरा व गाळ काढणेची, खाडीच्या पात्रातील केलेले अनाधिकृत बांधकाम पूर्णपणे निष्कासित करणेबाबत, स.नं. २९५ अ/१ मधील असलेली सर्व बांधकामे ही अनधिकृत असुन सदर ठिकाणी काही जुनी बांधकामे तोडुन नवीन बांधकामे केलेली आहेत. व काही बांधकामे पुर्णत: नवीन करण्यात आलेली आहेत.** याबाबत कर विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे अभिप्राय घेऊन **नवीन बांधकामे निष्कासित करण्याबाबत** तात्काळ कार्यवाही करणेबाबत कळविले आहे.

तरी प्रकरणी कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती यांचे निर्देशानुसार वरीलप्रमाणे वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करीत आहोत. सोबत उपस्थित असलेल्या सदस्यांची यादी, Geo Tagging सह फोटो व मंडळ अधिकारी भाईंदर यांचेकडील मूळ सादर केलेला आहे.

**(डॉ. नंदकिशोर देशमुख)**
**अपर तहसीलदार मिरा-भाईंदर**

उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्रमांक 362
दिनांक 19-10-2020
मुख्य लेखापाल उप वनसंरक्षक